Exh 4 / c
order
Seen & filed

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.04.22 17:35:04 +0530

3rd JMFC

जावक क्र ११६४/२०२६
इचलकरंजी पोलीस ठाणे
इचलकरंजी
दिनांक २०.०४.२०२६

प्रति,

मा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
कोर्ट, इचलकरंजी
यांना सविनय सादर ..

प्रतिवेदक :- सिमा जयसिंग डोंगरे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक इचलकरंजी पोलीस ठाणे इचलकरंजी
याजकडुन विनंतीपुर्वक की,

**विषय :- जप्त मुद्देमाल परत न देणेबाबत..**
संदर्भ :- मा न्याया कडील क्री फौ अर्ज नं ६७/२०२६ इचलकरंजी

महोदय,

२/- उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सादर की, इचलकरंजी पोलीस ठाणे गुरनं ४९१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८[४],३५१[२] तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ४,३९,४५,४८ व भा न्या संहिता कलम ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असुन सदर गुन्हयाचा तपास आम्ही स्वत: करीत आहोत.

तथापी वर नमुद संदर्भान्वये यातील अर्जदार श्रीधर कुजापु नायर वय ६५ रा लालनगर याने वरील गुन्हयातील जप्त विओ कंपनीचा वाय ३१ मोबाईल परत मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तथापी खालील नमुद कारणांकरीता सदरचा मोबाईल अर्जदार यांना परत देणेत येवु नये असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे.

१] सदरचा मोबाईल हा गुन्हयातील आरोपी नामे सौ ऋषिका सोमनाथ वाघमारे हिचे ताब्यातुन जप्त करणेत आलेला आहे. त्यामुळे सदर मोबाईल व त्यातील सीडी आर व एस डी आर बाबत तपास चालु आहे.

२] अर्जदार यांना सदरचा मोबाईल परत दिलेस तो मोबाईल नष्ट करणेची शक्यता आहे, तसेच त्यातील प्राप्त होत असलेले पुराव्यामध्ये छेडाछेड करणेची दाट शक्यता आहे.

३] अर्जदार यांस मोबाईल परत केलेस तो परस्पर त्याची विल्हेवाट लावणेची शक्यता आहे.

४] अर्जदार याचे नावावर असलेले वरील मोबाईल हे गुन्हयातील आरोपी हिचे ताब्यातुन जप्त करणेत आले असुन सदर मोबाईल बाबत तपास चालु आहे.

५] सदर गुन्हयाचा तपास अदयाप अपुरा ओ.

या वरील कारणांकरीता सदरचा मोबाईल अर्जदार यांना परत देणेत येवु नये असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे.

मा सविनय सादर

[ एस जे डोंगरे ]
श्रेणी पोलीस उपनिरीक्षक
इचलकरंजी पोलीस ठाणे

दाखल व पाहुन रवाना
तारीख -

पोलीस निरीक्षक,
इचलकरंजी पोलीस ठाणे

**मार्फत :-**
मा पोलीस निरीक्षक सो,
इचलकरंजी पोलीस ठाणे, इचलकरंजी

सरकार पक्षाचे म्हणणे :-

प्रस्तुत मुद्देमाल मोबाईल हा इचलकरंजी पो.स्टे गु.र.नं ४९१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३५१(२) तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ०४, ३९, ४५, ४८ ~~महाराष्ट्र~~ ~~सावकारी अधिनियम~~ प्रमाणे गुन्ह्यात जप्त करणेत आला आहे.

तपासी अधिकारी यांनी म्हणणे सादर केले असून गुन्हा अद्याप तपासावर असलेचे नमूद केले आहे व सदर तपास कामी या मुद्देमाल, मोबाईलची आवश्यकता आहे.

गुन्ह्याचे स्वरूप व तपासाची प्रलंबितता पाहता सदर मुद्देमाल अर्जदाराचे ताब्यात दिलयास तपासात व्यत्यय येऊ शकतो तसेच अर्जदार पुरावा नष्ट करू शकतो.

सबब प्रस्तुत मोबाईल अर्जदारास परत देणेबाबत सरकार पक्षाचा तीव्र विरोध आहे.

करिता म्हणणे सविनय सादर.

दि. २२/०४/२०२६

Jadhav

सहा. सरकारी अभियोक्ता,
इचलकरंजी.